# पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर

## दैनंदिन प्रेस नोट दि.१४/०१/२०१८

## दि.१३/०१/२०१८ रोजी रात्रौ ००/०० वा.ते २४/०० वा.पर्यंतचे दाखल गुन्हे

### भाग-१ ते ५ चे गुन्हे

१

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | कोथरूड पो स्टे १६/१८,भादविक ३९२,४२७,३४,महाराष्ट्र पोलीस कायदा १९५१ चे कलम ३७(१),सह १३५ व भारतीय हत्यार कायदा ४(२५) |
| **फिर्यादी** | रामकुमार कुर्मी,वय-४८,रा.बावधान-बुद्रुक,पुणे |
| **आरोपी** | दोन अनोळखी इसम |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.१२/०१/२०१८ रोजी २३/३० वा.सरस्वती पान शॉप ,आझादनगर,कोथरुड,पुणे या दुकानात |
| **तपशिल** | यातील फिर्यादी हे सरस्वती पान शॉपचे दुकान बंद करीत असतांना,यातील नमुद दोन अनोळखी इसमांनी फिर्यादी यांचे पान शॉप दुकानावर येवुन,फिर्यादी यांना तु पैसे घेतल्याशिवाय आम्हाला सिगारेट देत नाहीस असे म्हणुन त्यांना कोयत्याचा धाक दाखवुन, फिर्यादी यांना दमदाटी व शिवीगाळ करुन,त्यांचे दुकानातील २०००/- रू किचे सिगारेटची पाकिटे जबरदस्तीने चोरी करुन घेवुन गेले. तसेच पान मसाल्याचे भांडयावर कोयत्याने मारुन ते फोडुन नुकसान करून,दुकानाचे काऊंटरवर कोयता मारला आहे. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. दिगंबर जाखडे ९४२२५०८५३४ |

२

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | वाकड पो स्टे ३८/१८,भादविक ३९२,३४ |
| **फिर्यादी** | एक महिला,वय-३९,रा.कस्पटे वस्ती,वाकड,पुणे |
| **आरोपी** | मोटार सायकलवरील दोन अनोळखी इसम |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.१२/०१/२०१८ रोजी २०/३० वा. फॉच्युन बिझनेस सेंटर कस्पटे वस्ती,वाकड पुणे येथे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी हया पायी जात असताना,नमुद इसमांनी दुचाकीवरून त्यांचे जवळ येवुन, फिर्यादी यांचे गळयातील सोन्याचे दोन मंगळसुत्र २,७०,०००/- रू किमतीचे जबरदस्तीने हिसका मारून, तोडुन चोरून नेले. |
| **त.अंमलदार** | सहा.पोलीस निरीक्षक, डी.आर.लोंढे ८८८८८३६००७ |

३

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | पिंपरी पो स्टे २८/१८,भादविक ३०४(अ) |
| **फिर्यादी** | मोहमद खान,वय-२३ वर्षे,रा.चिंचवड,पुणे |
| **आरोपी** | शहाब खान,वय-३८ वर्षे,रा.आण्णसाहेब मगर वसाहती समोर चिंचवड,पुणे (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.१३/०१/२०१८ रोजी १३/३० वा.सायन्स पार्कचे तारांगण विभाग आण्णासाहेब मगर वसाहती समोर चिंचवड,पुणे येथे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी हे त्यांचा मित्र नामे दिलावार खान,वय-२३ वर्षे रा.सासन्स. पार्क समोरील पत्राशेड आण्णसाहेब मगर वसाहती समोर चिंचवड पुणे हा तारांगण विभाग,सायन्स पार्क चिंचवड,पुणे येथे काम करीत आसताना,त्याचा सेप्टी बेल्ट तुटुन तोल जावुन तो सोळा फुटा वरुन खाली पडुन,त्यामध्ये गंभीर जखमी होऊन मयत झाला आहे. तरी यातील नमुद इसम सुपरवायझर शहाब खान याने बांधकाम चालु असलेल्या साईटवरील,मजुर कामगारांकडुन काम करवुन घेत असताना,कामगारांचे जिवीताचे व सुरक्षिततेच्या दृष्टीकोनातुन त्यांना हेल्मेट,सुरक्षित जाळी, सेफ्टी बेल्ट इत्यादी योग्य ती साधनसामुग्री पुरविणे आवश्यक असताना,त्यांना तशी कोणतीही सुरक्षित साधने न पुरविता,कामगारांना चांगल्या प्रतीची आवश्यक ती साधने पुरविणे गरजेचे असताना,त्यांना निकृष्ठ दर्जाचे साहित्य देवुन, हलगर्जीपणा व निष्काळजीपणा केल्यामुळे कामगार नामे दिलावर खान याचे मृत्युस कारणीभुत झाला आहे. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. बोचरे ७७७४०५५७०० |

४

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | निगडी पो स्टे ३२/१८,भादविक ३०४(अ),३४ |
| **फिर्यादी** | सुनिल ढाकणे,पो.हवा. निगडी पो स्टे पुणे शहर |
| **आरोपी** | अजय जवाहर शर्मा,वय-४८,रा.मोरेवस्ती चिखली,पुणे (अटक) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.१०/०१/२०१८ रोजी १५/१५ वा. प्लॉट नं.३२३,सेक्टर नं.२५,प्राधिकरण,निगडी,पुणे येथे |
| **तपशिल** | निगडी पो स्टे अ.मयत रजि.नं.१६/१८,सीआरपीसी १७४ अन्वये मयताचे झाले तपासाचे चौकशीअंती कागदपत्राचे अवलोकन करता यातील नमुद इसम ठेकेदार अजय जवाहर शर्मा याने त्याचे प्लॉट नं.३२३,सेक्टर नं.२५, प्राधिकरण,निगडी,पुणे येथील बांधकाम चालु असलेल्या साईटवरील,मजुर कामगारां कडुन काम करवुन घेत असताना,कामगारांचे जिवीताचे व सुरक्षिततेच्या दृष्टीकोनातुन त्यांना हेल्मेट,सुरक्षित जाळी, सेफ्टी बेल्ट इत्यादी योग्य ती साधनसामुग्री पुरविणे आवश्यक असताना,त्यांना तशी कोणतीही सुरक्षित साधने न पुरविता,तसेच उघडया डक्टवर योग्य ती साधन ठेवण्याची सोय न करता,हलगर्जीपणा व निष्काळजीपणा केल्यामुळे,यातील बिगारी कामगार सुकरो मंहतो,वय-५०,रा.मोरेवस्ती चिखली,पुणे हा इमारतीचे तिस-या मजल्यावर सेन्ट्रींगचे काम करीत असताना,त्याचा पाय घसरून तोल जावुन,तो वरून खाली पडुन,त्यांचे डोक्यास गंभीर दुखापत होवुन मयत झाला. |
| **त.अंमलदार** | सहा.पो.निरी. जी.बी.खारगे |

**<u>दि.१४/०१/२०१८ रोजी रात्रौ ००/०० वा.ते दु.१२/०० वा.पर्यंतचे दाखल गुन्हे</u>**

१

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | डेक्कन पो स्टे १०/१८,भादविक ३०२,३०७,३४, भारतीय हत्यार का.क. ३(२५) |
| **फिर्यादी** | अतित देवेद शहा,वय-२८,रा.प्रभात रोड,पुणे् |
| **आरोपी** | दोन अनोळखी इसम वय अंदाजे ३० ते ४० वर्षे (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.१३/०१/२०१८ रोजी २३/१० वा. सायली अपार्ट.लेन नं.७,प्रभात रोड,पुणे येथील पार्कींग मध्ये |
| **तपशिल** | यातील फिर्यादी हे त्यांचे वडील देवेन शहा यांचेसह त्यांचे राहत असलेले बिल्डींगचे पार्कींग मध्ये आले असताना,कोणीतरी दोन अनोळखी इसमांनी देवेन शहा यांचेवर पिस्टल मधुन गोळया झाडुन,त्यांना गंभीर जखमी करून जीवे ठार मारले आहे. |
| **त.अंमलदार** | वरिष्ठ पो.निरी. अजय कदम ९८८११४०९०२ |

**जनसंपर्क अधिकारी,**
**पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर**